Maharashtra Arogya Mandal's

**SUMATIBHAI SHAH AYURVED MAHAVIDYALAYA**

Malwadi, Hadapsar, Pune - 411 028.

Phone : (020)29522505, 29522506, E-mail : ssayu@rediffmail.com

Date: 26/12/2023

# LOCAL MANAGEMENT COMITTEE MEETING

Local Management Committee Meeting of MAM's Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya Hadapsar, Pune will be held on 28/12/2023 at **2.30 pm**. in the Principal office discuss the following agenda. All members are requested to attend the meeting on time.

## AGENDA FOR MEETING

| | |
|---|---|
| 1/2023 | To confirm the proceedings of last Local Management Committee Meeting held on 18/11/2022. |
| 2/2023 | To inform College activities since last meeting. |
| 3/2023 | To give information about U.G. & P.G. Admission 2022-23, 2023-24. |
| 4/2023 | To inform about MUHS Winter 2022 & Summer 2023 Examination & Result. |
| 5/2023 | To give information about NAAC. |
| 6/2023 | To give information about Inspections of MUHS & NCISM. |
| 7/2023 | To transact any business with permission of chair. |

*NB: - Meeting will commence sharp at 2:30 pm.*

M.A.M's Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya PUNE-28. Hadapsar

26/12/23

**Secretary**

Local Management Committee

1. Hon. Dr. Patil S. F. - President, L.M.C.
2. Hon. Mr. Anil Gujar - Chairman, M.A.M. (Management)
3. Hon. Mr. Gujar Arun. S. - Joint Secretary, M.A.M. (Invitee)
4. Dr. Pranita Joshi-Deshmukh - Secretary, L.M.C.
5. Dr. Milind Joshi - Representative, Management
6. Dr. Abhijit Patil - Representative, Management
7. Mr. Jagannath Desai - Representative, Management
8. Dr. Anand Kalaskar - Teachers' Representative, Management
9. Dr. Sachinkumar Patil - Teachers' Representative, Management
10. Dr. Ramchandra Babar - Teachers' Representative, Management
11. Mr. Dashrath Dunghav - Non-Teaching' Representative, Management
12. Dr. Kavita Deshmukh - Vice Principal, (Invitee)
13. Dr. Ramesh Ujwale - P.G. Co-ordinator, (Invitee)

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे
# सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय
हडपसर, पुणे – ४११ ०२८.

दि.२७/०६/२०२३

## स्थानिक व्यवस्थापन समिती सभा इतिवृत्त

महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे येथील स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा मंगळवार दि.१८/११/२०२२ रोजी दु.२.३० वा.धन्वंतरी सभागृह (वर्ग क्र.७) मध्ये पूर्व सूचनेनुसार घेण्यात आली. या सभेस खालील सभासद उपस्थित होतेः–

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गुजर ए.एस. | – | सचिव, म.आ.मं.(व्यवस्थापन) |
| २. | डॉ. फुले एन.एम. | – | सचिव, स्थानिक व्यवस्थापन समिती. |
| ३. | डॉ. जोशी एम.ए. | – | व्यवस्थापन प्रतिनिधी. |
| ४. | श्री. देसाई जे.पी. | – | व्यवस्थापन प्रतिनिधी. |
| ५. | डॉ. कळसकर ए.व्ही. | – | अध्यापक प्रतिनिधी. |
| ६. | डॉ. पाटील एस्.एस्. | – | अध्यापक प्रतिनिधी. |
| ७. | डॉ. बाबर आर.पी. | – | अध्यापक प्रतिनिधी. |
| ८. | श्री. दुनघव डी.डी. | – | अध्यापकेतर प्रतिनिधी |
| ९. | डॉ. देशमुख के.एस. | – | उपप्राचार्य (निमंत्रित) |
| १०. | डॉ. जोशी–देशमुख पी.एस. | – | अनुसंधान समन्वयक म.आ.मं.(निमंत्रित). |

मा. डॉ. पाटील एस्.एफ्.–अध्यक्ष, स्थानिक व्यवस्थापन समिती व डॉ.अभिजित पाटील– व्यवस्थापन प्रतिनिधी हे पूर्व सूचना देऊन काही अपरिहार्य कारणामुळे अनुपस्थित होते.

स्थानिक व्यवस्थापन समितीचे सचिव–डॉ.निलेश फुले यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले.

**विषयः क्र.१ : मागील बैठकीचे इतिवृत्त वाचनः–**

१) मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन डॉ.निलेश फुले, सचिव स्थानिक व्यवस्थापन समिती यांनी केले, इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. डॉ.कळसकर यांनी काही दुरूस्ती सुचविल्या. विषय क्र.६/३ मध्ये. Pay Scale यायला पाहीजे. 7th Pay NCISM नुसार लागु करावा. AYUSH मंत्रालयानुसार

Lecturer - Pay Level -10 - Rs. 56,100 - 1, 77, 500
Reader - Pay Level -12 - Rs. 78,800 - 2, 09, 200
Professor - Pay Level -13 - Rs.1, 23,000 - 2, 15, 900
Principal - Pay Level -13A- Rs.1, 31,000 - 2, 16, 600 याप्रमाणे Pay Scale असावे असे सांगितले.

डॉ.बाबर यांनी exam चे Remuneration वेळेवर मिळावे. हा ही उल्लेख असावा, असे सांगितले. प्रांचार्यांनी विभागातून Exam चे Form वेळेवर येत नाहीत. पुढे विलंब होतो. तरी नेहमी पेक्षा Fast करत आहात. अशी माहिती दिली. सचिवांनीही त्याच दिवशी Exam चे Form यावेत असे सांगितले. CAP चे ही फॉर्म लवकर द्यावेत एकामुळे सगळा विलंब होतो. विभागातील सर्वच फॉर्म लगेच यायला हवेत. डॉ.बाबर यांनी नोटीस काढावी असे सुचविले. यानुसार किरकोळ दुरूस्तीसह मागील इतिवृत्त वाचनास मंजुरी दिली.

**विषयः क्र.२ : जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत झालेल्या विविध कार्यक्रमांची माहीती.**

- मागील LMC मध्ये सांगितल्यानुसार मासिक अहवाल सर्वांना पाठविले आहेत.– यापुढेही आधीच पाठविले जातील. असे प्राचार्यांनी सांगितले यानंतर अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले–मागील एल.एम.सी.नंतरचे प्रस्ताव पुढीलप्रमाणे.

म.आ.मं चे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय पुणे–२८.

- मार्च २०२२ महाविद्यालयातील कायचिकित्सा विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी डॉ.साधना रांगणेकर, डॉ.रोहित पाटील आणि स्त्रीरोग प्रसूतीतंत्र विभागातील डॉ.प्रियंका चौधरी, डॉ.अनुराधा गुप्ता या विद्यार्थ्यांना चरक फार्मा प्रायव्हेट लि.कंपनीद्वारे प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम रू.४०,०००/- चा धनादेश या स्वरूपाची चरक आयुवर्धन ही शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली.
- दि.११/०४/२०२२ रोजी निगडी येथील कॉलेज ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर येथील अगदतंत्र विभागाने महात्मा फुले जयंती निमित्ताने आयोजित केलेल्या ऑनलाईन पोस्टर स्पर्धेमध्ये स्वस्थवृत्त विभागातील पदव्युत्तर विद्यार्थीनी डॉ.सरिता मुरादे हिला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.
- दि.३०.०४.२०२२ रोजी Dynergic अॅवॉर्ड प्रस्तुत कार्यक्रमामध्ये डॉ. सचिनकुमार पाटील यांना आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल Best Professor Award – Kayachikitsa (Medicine) Speciality मिळाल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.
- दि.११.०५.२०२२ रोजी डॉ.नितीन वाघमारे व डॉ.प्रणिता जोशी-देशमुख यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली त्याबद्दल अभिनंदन.
- दि.०८ जून.२०२२ रोजी डॉ.सुनंदा व डॉ.सुभाष रानडे फौंडेशनतर्फे पारितोषिकासाठी डॉ.प्रियांका केराम-यांची निवड करण्यात आली त्यांच्या आयुर्वेद पत्रिका मासिकात दिलेल्या Management of Urdhvaga Amlapitta by Pittaghna Basti Shirodhara and Shamana Chikitsa - A Case Study लेखास प्रथम पारितोषिक प्राप्त झाल्याने त्यांचे अभिनंदन.
- दि.१४ ते २१ जुन २०२२ या कालावधीत आठवा आंतरराष्ट्रीय योग सप्ताह स्वस्थवृत्त विभागा मार्फत साजरा करण्यात आला. या दरम्यान महाविद्यालय व रूग्णालय परिसरात योग जागरूकता विषयाचे पोस्टर लावण्यात आले यामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले ते पुढीलप्रमाणेः- निबंध स्पर्धा, योगासन स्पर्धा, पोस्टर तयार करणे स्पर्धा, रांगोली स्पर्धा, स्लोगण तयार करणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पारितोषिक विजेते विद्यार्थी व अध्यापकांना पारितोषिक देण्यात आले. दि.२०/०६/२०२२ रोजी डॉ.ज्योती गवळी प्रपाठक रसशास्त्र विभाग यांनी योग जागरूकते विषयी व्याख्यान दिले व अनुभव सांगितले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त साने गुरूजी प्राथमिक विद्या मंदीर येथे योग प्रात्यक्षिके घेण्यात आली. यावेळी सौ.अर्चना फडणीस यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ.नितेश जोशी, डॉ.रोमा गंगावणे यांनी विभागप्रमुख डॉ.रमेश उज्वले यांच्या मार्गदर्शनाखाली केले.
- दि.२७ जुन २०२२ रोजी टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या ८९ व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयातील शालाक्यतंत्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ.निलाक्षी प्रधान यांना कार्यभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- दि.१ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयाच्या ३२ व्या वर्धापनदिन व वार्षिक पारितोषिक समारंभ धन्वंतरी सभागृहा (वर्ग क्र.७) मध्ये साजरा करण्यात आला. यावेळी शैक्षणिक वर्ष २०१९, २०२० व २०२१ या कालावधीत सांस्कृतिक, क्रिडा आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले.
- ऑगस्ट-ATA आयुर्वेद टीचर्स असोसिएशन तर्फे डॉ. निलाक्षी प्रधान-प्रोफेसर-शालाक्यतंत्र विभागप्रमुख, डॉ.विद्या उंडाळे-प्रपाठक-अगदतंत्र विभाग, डॉ.विवेक चौधरी-व्याख्याता-द्रव्यगुण विभाग Best teachers award ने सन्मानित करण्यात आले.
- दि.२६/०९/२०२२ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निर्देशानुसार स्वस्थवृत्त विभागातर्फे सप्टेंबर २०२२ हा महिना पोषण महिना म्हणून साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांनी भाग घेतला. यात महिलांचे स्वास्थ्य, बच्चा आणि शिक्षा-पोषण भी,पढाई भी, पाण्याचे नियोजन अशा विषयावर पोस्टर तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रणिता गटलेवार-प्रथम, कोमल गायकवाड-द्वितीय, सायली तनपुरे-तृतीय यांना बक्षीस देण्यात आले.

प.अ.म. चे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय पुणे-२८.

- दि.२९/०९/२०२२ रोजी समाजातील पोषण जागरूकता या विषयावर साने गुरूजी माध्यमिक विद्यालयमध्ये व्याख्यान दिले. याचा लाभ २०० विद्यार्थ्यांनी घेतला. विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच पदव्युत्तर विद्यार्थीनी डॉ.वैष्णवी कुलकर्णी यांनी संतुलित आहार क्रियाकल्प या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन डॉ.रमेश उज्वले यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.नितेश जोशी, डॉ.रोमा गंगावणे, डॉ.श्रावणी बाबर, सौ.अर्चना फडणीस तसेच स्वस्थवृत्त विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी केले.
- दि.०७/१०/२०२२ रोजी टिळक आयुर्वेद महाविद्यालय,पुणे येथे आयोजित केलेल्या श्री धूतपापेश्वर आयुर्वेद लि.प्रायोजित ज्योतिष्मती आयुर्वेद प्रश्नमंजूषा स्पर्धेत महाविद्यालयातील पदवी विद्यार्थी अथर्व शहाणे–चतुर्थ वर्ष बी.ए.एम.एस, मृण्मयी ससाणे–चतुर्थ वर्ष बी.ए.एम.एस, उषाकिरण चौधरी–तृतीय वर्ष बी.ए.एम.एस, श्रावणी काळे–प्रथम वर्ष बी.ए.एम.एस यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.
- दि.१०/१०/२०२२ व दि.११/१०/२०२२ या कालावधीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत पुणे विभागीय क्रिडा स्पर्धा आयुर्वेद महाविद्यालय, पेठ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेत महाविद्यालयातून व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, रनिंग, गोळाफेक, कबड्डी व खो–खो या क्रिडा प्रकारात एकूण ७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या मधील मृदुला सोन्ना–व्हॉलीबॉल व सम्यक दुगड–बास्केट बॉल यांची राज्यस्तरीय आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली.
- दि.१८ व १९/१०/२०२२ या कालावधीमध्ये महाविद्यालयातर्फे "डॉ.दादा गुजर व्हॉलीबॉल चषक चषक" स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत पुणे येथील भारती विद्यापीठ, सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, आयुर्वेद कॉलेज, वाघोली, टिळक आयुर्वेद कॉलेज,निगडी आयुर्वेद कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत मुलींच्या संघात आपले महाविद्यालय–विजेते व आयुर्वेद कॉलेज, निगडी उपविजेते या संघांनी पारितोषिक मिळविले तसेच मुलांच्या संघात आयुर्वेद कॉलेज, वाघोली–विजेते व आयुर्वेद कॉलेज–निगडी–उपविजेते या संघांनी यश संपादन केले.
- दि.२७/०९/२०२२ रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने डॉ.रोमा गंगावणे–व्याख्याता स्वस्थवृत्त विभाग यांनी पीएच.डी. ही पदवी संपादन केली. त्यांना डॉ.मेधा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले.

**विषय क्र.३: हिवाळी २०२१ परीक्षा व उन्हाळी २०२२ परीक्षा निकाल आणि हिवाळी २०२२ परीक्षेबाबत माहिती**

हिवाळी–२०२१ व उन्हाळी २०२२ परीक्षा व त्यांचे निकाल पुढीलप्रमाणे:–

**RESULT OF B.A.M.S. EXAMINATION (UG) – WINTER -2021, SUMMER-2022**

| YEAR | MONTH OF EXAMINATION | Course/ Pattern | NUMBER OF TOTAL STUDENTS APPEARED | NO. OF TOTAL STUDENTS PASSED EXAM | PERCENTAGE OF PASSING |
|---|---|---|---|---|---|
| FIRST B.A.M.S. | WINTER-2021 | 2017 | 62 | 52 | 83.87 % |
| | | 2012 | 01 | 01 | 100.00 % |
| | SUMMER-2022 | 2017 | 11 | 07 | 63.63 % |
| | | 2012 | | | - |
| SECOND B.A.M.S. | WINTER-2021 | 2017 | 09 | 07 | 77.77 % |
| | | 2012 | 02 | 01 | 50.00 % |
| | SUMMER-2022 | 2017 | 03 | 03 | 100.00 % |
| | | 2012 | 02 | | - |
| THIRD B.A.M.S. | WINTER-2021 | 2010 | 01 | 01 | 100.00 % |
| | | 2012 | 01 | - | - |
| | SUMMER-2022 | 2017 | 62 | 58 | 93.54 % |
| | | 2012 | 02 | - | - |
| FOURTH B.A.M.S. | WINTER-2021 | 2012 | 01 | - | - |
| | | 2017 | 58 | 58 | 100.00 % |
| | SUMMER-2022 | 2012 | 01 | - | - |
| | | 2012 | 02 | 01 | 50.00 % |

**RESULT OF P.G. & P.G. DIPLOMA EXAMINATION - 2022**

| YEAR | YEAR OF THE EXAMINATION | NO. OF TOTAL STUDENTS APPEARED | NO. OF TOTAL STUDENTS PASSED EXAM | PERCENTAGE (%) OF PASSING |
|---|---|---|---|---|
| M.D./M.S. (Ayu.) Preliminary | WINTER-2021 | 01 | 01 | 100.00 % |
| | SUMMER-2022 | 62 | 49 | 79.03 % |
| M.D./M.S. (Ayu.) Final | WINTER-2021 | 59 | 59 | 100.00 % |
| | SUMMER-2022 | 02 | 02 | 100.00 % |
| P.G. Diploma (Ayu.) | WINTER-2021 | 05 | 05 | 100.00 % |
| | SUMMER-2022 | - | - | - |

➢ हिवाळी २०२२ विद्यापीठ परीक्षेबाबत माहिती-उपप्राचार्यांनी दिली. हिवाळी २०२२ च्या UG च्या परीक्षा दि.१३ ते ३० डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. यामध्ये २०१२,२०१७ Pattern चे विद्यार्थी आहेत. या परीक्षांचे केंद्र रंगुनवाला डेंटल कॉलेज कॅम्प येथे आहे. PG च्या परीक्षा Pre MD-15,17 डिसेंबर रोजी व Final MD-15,17,20,22 डिसेंबर रोजी आहेत त्याचे केंद्र श्रीमती काशीबाई नवले मेडीकल कॉलेज नऱ्हे आंबेगाव बु. येथे असणार आहे. आपल्या महाविद्यालयातही परीक्षा केंद्र असणार आहे. १३ ते ३० डिसेंबर यामध्ये नर्सिंग व फिजिओथेरपी चे विद्यार्थी असणार आहेत.

**विषय क्र.४ पदवी व पदव्युत्तर २०२२-२३ प्रवेशाबाबत माहिती.**

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर प्रक्रियेबाबत मा.प्राचार्यांनी खालील माहिती दिली. गेल्यावर्षी Admission Process खुप लांबली. यावर्षीची माहिती अजुन नाही Inspection ही खुप लांबले-अजुन Permission प्राप्त नाही. अनेक कॉलेजेसना Permission प्राप्त झालेली नाही. Seat matrix प्राप्त झाले आहे. यावर्षी Central तर्फे सर्व Admission होणार आहेत 85% State Quota व 15% Institutional Quota आहे. Competent Autherity द्वारे Admission होणार आहे. महाविद्यालयाकडे काही नाही.

**UG Admission:-**

Publication of Seat matrix-16-11-2022 ला होणार आहे.

पहिली यादी दि.२३ नोव्हेंबर ला लागणार आहे.

दि.२४ ते ३० या कालावधीत प्रथम फेरी होणार आहे.

All India Quota चे दि.१२ ते १६ डिसेंबर २०२२ या कालावधीत Registration आहे.

दि.१७ ला मेरिट लिस्ट लागेल व दि.२३ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत प्रवेश प्रक्रिया होणार आहे.

**PG Admission:-** प्रवेशाबाबत अजुन माहिती नाही.

कौमारभृत्य **Fellowship** ची मान्यता आहे. त्याची प्रवेशप्रक्रिया पीजी प्रवेशानंतर होईल.

**Ph.D. Admission:-**१३ विषयात आहे. ५० पेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेशित होतील.

**विषय क्र.५ अध्यापक नेमणूकीबाबत माहिती**

**अध्यापक नेमणूक प्रक्रियेद्वारे खालील विभागासाठी अध्यापकांची निवड करण्यात आली.**

दि.३० जुलै २०२२ रोजी १८ पदांसाठी अध्यापकांची नेमणुक झाली. त्यांचे approval येणेबाकी आहे.

दि.०५ नोव्हेंबर २०२२ रोजी ४ पदांसाठी Interview झाले त्याचे Approval प्रस्ताव पाठविले आहेत.

दि.१० जून २०२१ पासून Bio Statistic साठी सौ.ज्योती जवळकर यांची नवीन नेमणुक झाली.

Roster भरण्याबाबत काम चालू आहे.

**विषय क्र.६ अध्यक्षांचे संमतीने आयत्या वेळचे विषयः-**

१. मा.प्राचार्यांनी Inspection ची माहीती दिली NCISM व MUHS चे Surprise inspection झाले. कमिटी ऑफीस मध्ये आल्यावरच समजले NCISM Inspection Hybrid स्वरूपात होते. २ कमिटी मेंबर आले होते. व १ कमिटी मेंबर Online Joined होते.

6-7 June - 2022 ला 13A बालरोग PG साठी Inspection झाले. व २२ जुलै ला MUHS चे Inspection झाले. 20, 21 ऑक्टोबर २०२२ रोजी NCISM चे 13C चे Inspection झाले. त्यांचे Permission पत्र प्राप्त व्हायचे आहे.

२. Roster ची माहीती आधीच दिली आहे.

३. NAAC ची माहीती डॉ.प्रणिता जोशी-देशमुख यांनी दिली.-डिसेंबर २०२२ पर्यंत application करण्यासाठी तयारी चालू आहे. criteria wise documentation तयार करणे चालू आहे. Sports, cultural activity कोविडमुळे २ वर्ष नव्हत्या त्या या वर्षात घेत आहोत तो Data दाखविता येईल.

४. वर्गात mobicomp बसविला आहे. Screen व फळा दोन्ही वापरता येईल. अशी सोय केली आहे. फक्त Pendrive घेऊन जाता येईल. Terrace चे Water proof चे काम केले आहे. अशी माहिती प्राचार्यांनी दिली.

५. डॉ.प्रणिता जोशी-देशमुख यांनी Solar Project (100 KW) चा हॉस्पीटल मध्ये बसविला त्याची माहीती दिली. CSR कडून Major support मिळाला आहे. शाळेतही यावर्षी बसविण्याचे नियोजन आहे. यामुळे Electricity वरील खर्च कमी होईल. तसेच आय.सी.आय.सी.आय. बँकेकडून रू.80 lakh critical equipments साठी मिळाले आहेत. शालाक्य विभागासाठी Microscope खुप दिवसांपासून Pending आहेत ते घेता येतील. डॉ.देसाई यांनी Proposal चांगले आहे. उपयोगी आहे. मी पण बसविले अशी माहीती दिली.

मा.सचिव यांनी डॉ.प्रणिता जोशी-देशमुख यांचेही नाव अभिनंदन प्रस्तावात घ्यावे असे सांगितले.

डॉ.राजेश पवार यांनी 2 Project दिले आहेत. अशी माहिती दिली.

डॉ.मिलिंद जोशी यांनी सांगितले की हॉस्पीटलचे काम वाढले आहे. गायनॅक, शल्य विभागाचे काम चांगले आहे. त्याला उपयोग होईल. शालाक्य विभागाचे काम कमी आहे ते आता वाढेल. असे सांगितले.

डॉ.कळसकर यांनी मा.प्राचार्यांचे अभिनंदन केले. ६ महिन्याचे मासिक अहवाल सर्वांना पाठविले आहेत. त्यामुळे वेळ वाचतो मी 1st LMC Member झालो तेव्हाच सांगितले होते. आता अमलात आले. त्याबद्दल अभिनंदन तसेच उन्हाळी,हिवाळी सुट्या सर्व अध्यापकांना दिल्या. त्याबद्दल प्राचार्यांचे आभार मानले. Inspection च्या गडबडीत निर्णय घेऊन नोटीस काढून व्यवस्थित नियोजन केले. प्राचार्यांनीही- Inspection मुळे सुट्या देता येत नव्हत्या. त्यामुळे उशिरा जाहीर कराव्या लागल्या अशी माहीती दिली व मा.सचिवांनी सुट्या देण्यास परवानगी दिली. त्यामुळे सरांचेच आभार.मा.सचिवांनी सांगीतले की सर्व जण सुट्या घेऊन फ्रेश झाले आहेत. त्यामुळे NAAC चे काम लवकर पुर्ण करा व सर्वांनीच काम करावे. असे सांगितले.

प्राचार्यांनी NAAC चे प्रपोजल डिसेंबर मध्ये Submit करता येईल तसेच यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. LMC Members नीही अध्यापकांना यासाठी प्रवृत्त करावे असे सांगितले.

डॉ.कळसकरांनी प्राचार्यांचे नियोजन चांगले आहे. सर्वांना एकच नियम लावतात. तसेच मागील LMC मिटींग-दि.२८-०२-२०२२ ला झाली. आताची मिटींग उशिर का झाली असे विचारले.

प्राचार्यांनी-कोविड काळात उशिरा मिटींग झाल्या.२०२०,२०२१ मधील मिटींग पुढे पुढे गेल्या. यापुढे जुन/डिसेंबर मधे मिटींग होतील असे नियोजन करू वर्षातुन २ LMC मिटींग होतात. Inspection/ परीक्षा यामुळे delay झाले. मासिक अहवालात काही गोष्टी नाहीत. माझ्या वैयक्तिक काही गोष्टी आल्या नाहीत अशी माहीती डॉ.कळसकरांनी दिली. सप्टेंबर मधे online lecture घेतले. तसेच २ पुस्तके प्रकाशीत झालीत त्याची नोंद व्हावी. तसेच Pay Scale यायला पाहीजे. 7th Pay NCISM नुसार लागु करावे. या पुढे compulsion होऊ शकते. त्यानुसार लवकरात लवकर लागु व्हावे.

प्राचार्यांनी जे मुद्दे राहीले आहेत त्यासाठी पुरक अहवाल तयार करू असे सांगितले. काही अध्यापक वेळेवर अहवाल देत नाहीत. उपस्थिती पत्रके देत नाहीत. त्यामुळे मासिक अहवालात. घेता येत नाहीत. डॉ.कळसकर यांचे २ पुस्तके लिहिल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. काही अध्यापक कॉलेजला माहीती देत नाहीत. अध्यापकांनीही माहीती वेळेवर सादर करावी असे सांगितले.

प.प्रा.म. दे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय पुणे-२८.

प्राचार्य हा अध्यापक व संस्था यामधील दुवा आहे. काही बाबतीत संस्थेचाही विचार करणे आवश्यक आहे. सर्वच कर्मचाऱ्यांनी याचा विचार करावा. आपल्या संस्थेचे पगार वेळेवर होतात. इतर ठिकाणी एक देतात एक दाखवतात. आपली मागणी नक्कीच संस्थेकडे पोचवु असे प्राचार्यांनी सांगितले. मा.सचिवांनी NCISM Norm नुसार पगार Calculate करावा. difference बघावा व मागणी करतांना उत्पन्न किती याचा विचार करा. असे सांगितले. NCISM 50 % Fee कमी करणार आहे. का शक्य तेवढे follow करावे. असे सांगितले.

डॉ.कळसकर यांनी – Exam remuneration बाबत Account Section शी बोललो त्यांनी University कडून Funds कमी मिळतात. तुम्ही विद्यापीठाकडे demand करा. यापुर्वी एवढा उशिर होत नव्हता असे सांगितले. त्यावर प्राचार्यांनी सांगितले की विद्यापीठाकडून Funds वेळेवर मिळत नाहीत. तसेच Summer–Winter परीक्षा टप्प्या टप्प्याने होत गेल्या. मागील परीक्षा खुप Late झाल्या. असे सांगितले.

डॉ.कळसकर यांनी Exam च्या दिवशीच सर्वांना Remuneration द्यावे. असे सुचविले तसेच बाहेरील Examiner ला Lodging charges देतो. आपल्याला बाहेर मिळत नाहीत यावर विचार करावा. Examiner Bill Submit करतात किंवा आपण स्वतःचे देत असू तर त्यावर विचार करावा. असे सांगितले.

प्राचार्यांनीही – त्या त्या दिवशीच ते Form Submit व्हावे.असे सांगितले. सचिवांनीही सांगितले की उशिर का होतो तसेच audit झाले का असे विचारले.

डॉ.बाबर यांनीही दिनांक १६–१७ July ला LIC साठी गेलो होतो. त्याची माहीती मासिक अहवालात आली नाही. तसेच Non clinical अध्यापकांनी EL ची मागणी केली आहे. Vacation ऐवजी EL मिळाव्यात असे सांगितले. प्राचार्यांनी सांगितले EL सुट्टीच्या ऐवजी मिळतात. Vacation मध्ये विद्यार्थी नसतांना सुट्टी असते. त्यावेळी Clinical अध्यापकांना काम असते. यावर तुम्हीच चर्चा करा. सचिवांशी बोलुन निर्णय घेऊ असे सांगितले. डॉ.सचिनकुमार पाटील यांनी सेवानिवृत्ती बाबत MUHS चे पत्र मआविवि/शैवि/४०५५/२०–२२ दि.१०/११/२०२२ प.क्र.१०५/२०२२ नुसार वयोमर्यादा ६४ वर्षे केली आहे. आपल्याकडे ६० वर्षे आहे. या नुसार सर्वच शिक्षकांनी मागणी केली आहे. सर्वांच्या मागणीचा विचार करावा. त्यावर काहीतरी मार्ग काढावा. सचिवांनी–शिक्षकांनाच का फायदा बाकीचे employee चे काय. संस्थेला इतरही जबाबदाऱ्या असतात. फक्त शिक्षकांनाच देऊ शकत नाही. विद्यापीठांनी compulsion केल्यास काय यावर. विद्यापीठानी संस्थेचाही विचार केला पाहिजे. असे सांगितले. डॉ.सचिनकुमार पाटील यांनी पुरक अहवालात काही नोंदी घ्याव्यात असे सांगितले. प्राचार्यांनी पुन्हा, अध्यापकांनी वेळेवर माहीती दयावी असे सांगितले.

श्री.दशरथ दुनघव–यांनी श्री.भिकन कोळी यांना पदोन्नती मिळावी अशी मागणी केली आहे. त्यांना Senior Clerk करावे व श्री.चव्हाण यांना Head Clerk करावे. त्यावर प्राचार्यांनी ऑफीसचे काम अधिभार बघुन त्यानुसार निर्णय घेऊ असे सांगितले. प्राचार्यांनी–Scale वर घेण्याचा विचार आहे. सचिव व संस्था योग्य तो निर्णय घेईल. असे सांगितले. सचिवांनी प्रत्येक मिटींगमध्ये हेच मुद्दे येतात. संस्थेच्या विकासासाठी काय करू शकतो याबाबत चर्चा व्हायला पाहीजे. असे सांगितले.

पाण्याच्या कामाबाबत विचारले. सचिवांनी दशरथ यांना तुम्ही Follow up घ्या. असे सांगितले. श्री.दशरथ दुनघव यांनी 'मी मृतदेह' ही कविता लावावी व प्राचार्यांनी ते होईल असे सांगितले. तसेच डॉ.मिलिंद जोशी यांनी Biomedical Eng आहेत का असे विचारले त्यावर मा.सचिव यांनी आहेत असे सांगितले. आठवडयातून २ दिवस येतात. दोन्ही हॉस्पीटलचे काम बघतात अशी माहिती दिली.

मा.प्राचार्यांनी सर्व विषय संपले आहेत असे सांगून पुनश्च सर्वांचे आभार मानले व मिटींग ४.३० वाजता संपली.

म.आ.मं.चे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय पुणे–२८.

for [signature]

**प्राचार्य**
**म.आ.मं.चे सुमतिभाई शाह**
**आयुर्वेद महाविद्यालय,**
**हडपसर, पुणे- ४११ ०२८.**